21 MAR 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे स्वत:चे 'एसआरपीडी' ॲप विकसित

■ परीक्षेचा अर्ज भरण्यापासून ते निकाल जाहीर करण्यापर्यंतच्या कामाला येणार वेग

■ लॉगईनमधून प्राध्यापकांना कॅप सेंटरची माहिती मिळणार, पेपर सेटींगचीही सुविधा



अहिल्या परकाळे
कोल्हापूर

भविष्यात शिवाजी विद्यापीठ सिक्युअर रिमोट पेपर डिलिव्हरी सिस्टीम (एसआरपीडी) ॲप स्वत: विकसित करणार आहे. त्यामुळे परीक्षा घेण्यापासून ते निकाल जाहीर करण्यापर्यंत सर्वच कामांना वेग येणार आहे. स्वत:चे ॲप विकसित झाल्यानंतर प्रशासनाच्या खर्चात कपात होईल. तंत्रज्ञान हाताळण्यासाठी पूरक मनुष्यबळ असल्याने सध्या या ॲपची चाचणी सुरू आहे. ॲपवरून पेपर तपासणीसाठी कोणते कॅप सेंटर मिळाले, याची माहिती प्राध्यापकांना कळणार आहे. प्राध्यापकांनी पेपर तपासणी केली का, पेपर तपासले असतील तर ऑनलाईन गुण भरले की नाही, याची माहिती मिळणार आहे. प्रवेशापासून ते निकालापर्यंत सर्वच परीक्षेची कामे करणे सुलभ होणार आहे.

विद्यापीठात कोरोना काळात विस्कळित झालेले परीक्षेचे वेळापत्रक पुर्ववत झाले आहे. परीक्षेनंतर अवघ्या पंधरा दिवसांत परीक्षांचे निकाल जाहीर केले. परीक्षेच्या वेळापत्रकंप्रमाणेच पेपर तपासणीचे वेळापत्रक तयार करून पेपर तपासणी करून घेतली आहे. विद्यापीठाने एसआरपीडी व्यतिरिक्त परीक्षेची सर्व ॲप स्वत: डेव्हलप केली आहेत. त्यामुळेच कमी वेळेत परीक्षांचे निकाल जाहीर करणे शक्य झाले आहे. परिणामी, विद्यापीठ प्रशासन राज्यभर रोल मॉडेल बनले आहे.

राज्याच्या शिक्षण आयुक्तांनी परीक्षांचे निकाल कशा पध्दतीने लावले, याच्या सादरीकरणासाठी शिवाजी विद्यापीठातील परीक्षा संचालकांना मुंबईला बोलावले आहे. हा विद्यापीठासाठी आणखी एक मानाचा तुराच म्हणावा लागेल. भविष्यात स्वत:चे एसआरपीडी ॲप केल्यानंतर परीक्षा विभागावरील ताण कमी होणार आहे. संगणक विभागातील कर्मचारी तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षित असल्याने परीक्षेचे काम करणे सोपे जाते आहे. सध्या प्रशासन युध्दपातळीवर एसआरपीडीवर काम करत आहे. ॲपची चाचणी पूर्ण झाल्यानंतर लवकरच हे ॲप विकसित होईल.

करारावर असलेल्या एसआरपीडीच्या माध्यमातून महाविद्यालय, अधिविभागांना प्रश्नपत्रिका पाठवल्या जातात. प्राचार्यांच्या लॉगईनमधून प्रश्नपत्रिका पाठवल्यानंतर महाविद्यालयावरील परीक्षा प्रमुखांनी लॉगईन आयडीवरून प्रश्नपत्रिका घेऊन त्याची प्रिंट व झेरॉक्स विद्यार्थ्यांना द्यायची आहे. परंतु अनेक ठिकाणी प्रश्नपत्रिका फुटल्याची उदाहरणे आहेत. प्रशासनाने संबंधितांना शिक्षा केली असून, महाविद्यालय प्रशासनाला कडक भाषेत सूचना दिल्या आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठीच विद्यापीठ स्वत:चे एसआरपीडी ॲप विकसित करत आहे.

## विद्यापीठाच्या एसआरपीडीत या सुविधा

परीक्षा विभागाच्या गरजा विचारात घेऊन परीक्षा विभागाचे संगणकीकरण केले आहे. प्राध्यापकांना नियुक्ती आदेश वितरण, प्रश्नपत्रिका वितरण प्रणाली विकसित केली आहे. त्यामुळे वेळेचा व कागदाचा अपव्यय टळला आहे. ॲपमधून प्राध्यापकांना ऑनलाईन पेपर सेटींग करता येणार आहे. प्राथमिक स्वरूपात ॲपमधून फार्मसीची परीक्षा घेऊन ती यशस्वी झाली आहे. दुसऱ्या टप्प्यात परीक्षांची संख्या वाढवली असून या परीक्षा येत्या काही दिवसात होणार आहेत. पेपर तपासणीसह परीक्षेच्या कामाचे मानधन एसआरपीडीतून अदा केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात युवा संवाद कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने 'युवा संवाद भारत @ २०४७' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेत शहरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी उपस्थित होते. स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवापर्यंत विकसित भारताचे ध्येय, गुलामगिरी व वसाहतवादी मानसिकतेचे उच्चाटन, देशाचा संपन्न वसा व वारसा यांचा अभिमान, भारताची एकता व एकात्मता आणि नागरिकांमध्ये कर्तव्याची भावना रुजवण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करणे, या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. अविनाश भाले यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक अमोल कुलकर्णी यांनी आभार मानले.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात युवा संवाद कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने 'युवा संवाद भारत २०४७' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली. राजर्षी शाहू सभागृहात आयोजित कार्यशाळेत शहरातील विविध महाविद्यालयांतून प्रातिनिधिक विद्यार्थ्यांसह विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि अन्य अधिविभागांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते. विकसित भारताचे ध्येय, गुलामगिरी व वसाहतवादी मानसिकतेचे उच्चाटन, देशाचा संपन्न वसा व वारसा, एकता, एकात्मता व कर्तव्याची भावना रुजवण्याच्या दृष्टीने कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेत अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. अविनाश भाले यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक अमोल कुलकर्णी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात युवा संवाद कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'युवा संवाद भारत @ २०४७' या विषयावर कार्यशाळा पार पडली. राजर्षी शाहू सभागृहात आयोजित कार्यशाळेत शहरातील विविध महाविद्यालयांतून प्रातिनिधिक विद्यार्थ्यांसह विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि अन्य अधिविभागांतील विद्यार्थी सहभागी झाले. कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024
सकाळ

# ग्रंथपालांची राष्ट्रीय कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २० : न्यू कॉलेज, भोगावती महाविद्यालय कुरुकली आणि शिवाजी विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथपाल संघटनेतर्फे 'ग्रंथालय व माहितीशास्त्रात कृत्रिम बुद्धिमत्ता' यावर ग्रंथपालांसाठी राष्ट्रीय कार्यशाळा झाली. डॉ. गोपाकुमार यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. आर. पी. आडाव यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

21 MAR 2024 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 4,500 research papers now available on Shivaji University's website

Times News Network

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has made the information about the ongoing and conducted research on various subjects through the Ph.D, M.Phil courses available online.

This digital facility will help the researcher students from affiliated colleges and various sub-departments get 4,500 research paper dissertations, which have already been done so that the research topics are not repeated.

Earlier, there was no information about the subjects on which research was going on and who was doing it. So same subjects were selected by two to three students for research.

Later, the topic had to be changed at the last moment after learning that research had already been done on that topic. This used to cause financial as well as mental trouble to students.

To avoid this situation, the university has made information such as the name of the researcher, his subject etc available on the research section of the website from last month.

Yuvraj Kadam, the head of Vachankatta Multi-Purpose Organisation, said, "New researchers should get information about the ongoing research on the university website so they can select the research topic for further innovation. Accordingly, a research list of all subjects has been published on the website. This has made it easy for new researchers and curious readers to get research information."

While V S Soyam, deputy registrar of the PGBUTR department, said, "On the University website, in the research topic in SUK section, the information about the researcher, guide name, topic etc from the year 2017-18 has been given. At present, information about 4,500 research papers are available." This information will be updated after the registration and results of Ph.D, M.Phil."

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024

महासत्ता

# स्त्रियांना सन्मानाची वागणूक देणारे एकमेव राजे छ. शिवाजी महाराज - डॉ. मंजुश्री पवार

गडहिंग्लज ता.१९ (प्रतिनिधी)-

..............................

स्त्रियांचा मानवतावादी दृष्टीकोनातून विचार करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे मध्ययुगीन कालखंडातील एकमेवाद्वितिय राजे होते, असे गौरवोद्गार मराठा इतिहास अभ्यासक डॉ. मंजुश्री पवार यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कै. शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील होत्या. डॉ. मंजुश्री पवार म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा काळ हा स्त्रियांच्या बाबतीत मानवतावादी दृष्टीकोनातून विचार करण्यासाठीचा आश्वासक काळ होता. मध्ययुगीन जगाच्या इतिहासामध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजे होते, ज्यांनी स्त्रियांना समाजात आदराची व सन्मानाची वागणूक दिली. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणारा कोणीही असो, त्याला अतिशय कडक शिक्षा केल्या. सद्यस्थितीत स्त्रियांवरील अत्याचारांत दिवसेंदिवस वाढ होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणा देवून भागणार नाही, तर त्यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा सुरजित अडगळे द्वितीय

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धमध्ये शिवाजी विद्यापीठाचा संशोधक विद्यार्थी सुरजित अडगळे याच्या 'सिंथेसायझिंग बायोप्लास्टिक अँड वेगन लेदर' या संशोधनास मूलभूत विज्ञान प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. मुंबई विद्यापीठात नुकत्याच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धा पार पडल्या.

सुरजितने निवडुंगाच्या गरापासून जैविक प्लास्टिक आणि चामडे यशस्वीपणे बनवून या प्रकल्पाचे स्पर्धेत सादरीकरण केले. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेचे यजमानपद शिवाजी विद्यापीठाने भूषवले. दि. २८ व २९ डिसेंबर या कालावधीत सदर स्पर्धा विद्यापीठात झाली. यात महाराष्ट्र व गुजरात राज्यातील ११ विद्यापीठांचे १०६ संशोधक विद्यार्थी एकूण ६४ प्रकल्पांसह सहभागी झाले होते. यात शिवाजी विद्यापीठाचा सहा जणाचा संघ होता. या स्पर्धेत सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाच्या सुरजित घनश्याम अडगळे याला द्वितीय क्रमांक मिळाला. त्याला ५० हजार रोख रक्कम, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी संघ व्यवस्थापक म्हणून राहुल जाधव, डॉ. सिद्धेश्वर जाधव उपस्थित होते. अडगळे याच्या यशाबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि विद्यार्थी विकास संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024
सकाळ



कोल्हापूर : गुलमर्ग येथील राष्ट्रीय आईस स्टॉक स्पर्धेतील यशस्वी श्रेयस कोळीचे डॉ. संजय कुबल यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी डॉ. प्रसाद दावणे, विभा अंत्रेडी, डॉ. नितीन रणदिवे उपस्थित होते.

# राष्ट्रीय आईस स्टॉक स्पर्धेत श्रेयस कोळीला दोन सुवर्ण

कोल्हापूर, ता. २० : गुलमर्ग (जम्मू-काश्मीर) येथे झालेल्या राष्ट्रीय आईस स्टॉक स्पर्धेत कोल्हापूरच्या श्रेयस कोळी याने दोन सुवर्ण, एक रौप्यपदक पटकाविले.

श्रेयस शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात अर्थशास्त्र द्वितीय वर्षाचा विद्यार्थी आहे. त्याला इंडियन आईस स्टॉक फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष महेश राठोड, सोमेश सनदी, अजय सरवदे, प्रवीणसिंह कोळी, यश सरनाईक यांचे मार्गदर्शन, तर केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव डॉ. संजय कुबल, चंद्रकांत चौतमिरे, उपकुलसचिव विभा अंत्रेडी, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. प्रसाद दावणे, डॉ. नितीन रणदिवे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024
पुढारी

# नॅशनल आईस स्टॉक स्पोर्टस् स्पर्धेत श्रेयस कोळीचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात अर्थशास्त्र द्वितीय वर्षाचा विद्यार्थी श्रेयस पांडुरंग कोळी याने राष्ट्रीय आईस स्टॉक स्पोर्टस् या स्पर्धेमध्ये दोन सुवर्ण व एक रजतपदक प्राप्त करून यश संपादन केले आहे.

जम्मू व काश्मीर येथील गुलमर्ग येथे इंडियन आईस स्टॉक फेडरेशनतर्फे ९ ते १२ मार्च २०२४ या कालावधीत स्पर्धा झाल्या. आईस स्टॉक खेळामध्ये पाच प्रकार आहेत. सांघिकमध्ये टीम टार्गेट, टीम डिस्टन्स, टीम गेम आणि वैयक्तिक प्रकारामध्ये इंडिव्हिज्युअल टार्गेट व इंडिव्हिज्युअल डिस्टन्स यांचा समावेश आहे. टीम टार्गेट प्रकारात स्कोर किंवा पॉईंटस् मिळवायचे असतात. टीम गेममध्ये खेळातील क्वीनच्या जवळ ज्या टीमचा स्टॉक शेवटपर्यंत राहतो, ती टीम पॉईंटसद्वारे जिंकते. टीम डिस्टन्स या प्रकारात शक्य तितक्या लांब अंतरापर्यंत आपल्याला स्टॉक स्लाईड करावयाचा असतो. या स्पर्धेमध्ये श्रेयसने यश मिळविले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024
तरुण भारत

# नॅशनल आईस स्टॉक स्पर्धेत श्रेयस कोळीचे यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व



ऑनलाईन शिक्षण केंद्रात अर्थशास्त्र द्वितीय वर्षाचा विद्यार्थी श्रेयस पांडुरंग कोळी याने राष्ट्रीय आईस स्टॉक स्पोर्ट्स स्पर्धेत दोन सुवर्ण व एक रजत पदक प्राप्त केले. जम्मू व काश्मीर येथील गुलमर्ग येथे इंडियन आईस स्टॉक फेडरेशनच्या वतीने ९ ते १२ मार्च दरम्यान स्पर्धा झाल्या. श्रेयसला इंडियन आईस स्टॉक फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष महेश राठोड, सोमेश सनदी, अजय सरवदे, प्रवीणसिंह कोळी, यश सरनाईक यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024

नाईट वॉच

# शिवाजी विद्यापीठातील जीव, रसायनशास्त्र अधिविभागातील तीन विद्यार्थ्यांची फॉरेन्सिक डिपार्टमेंट मध्ये निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील जीवरसायनशास्त्र अधिविभागातील प्रतिभा माळी, हर्षद बोटे आणि चेतन टाके या तीन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित परीक्षेतून वर्ग-२ (राजपत्रित) अधिकारी ssistant Chemical nalyzer पदावर फॉरेन्सिक डिपार्टमेंट मध्ये निवड झालेली आहे. या संशोधन विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, अधिविभागप्रमुख प्रा. कैलास सोनवणे, प्रा. ज्योती जाधव, डॉ. प्रदीप गुरव, डॉ. पंकज पवार, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. संदीप काळे या प्राध्यापकांचे विशेष मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAR 2024

नाईट वॉच

# नीना मेस्त्री नाईक यांची निवेदनशैली अजरामर-रवींद्र ओबेरॉय

कोल्हापूर : आकाशवाणीच्या ज्येष्ठ निवेदिका नीना मेस्त्री-नाईक यांच्या आवाजात जादू होती. शब्दांत भावना ओतण्याची कला त्यांना अवगत होती. त्यांची निवेदनशैली अजरामर राहिल, असा विश्र्वास ज्येष्ठ उद्योजक रवींद्र ओबेरॉय यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागात नीना मेस्त्री नाईक यांना अभिवादन करण्यासाठी शोकसभेचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कोल्हापूर आकाशवाणी केंद्राचे संचालक डॉ. सुनिल गायकवाड होते.

यावेळी पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार, मराठी विभागातील ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे, निवृत्त शिक्षणाधिकारी आणि लेखक डॉ. बसंत गायकवाड, वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, नीना मेस्त्री यांचे पती अरूण नाईक, कन्या तन्वी नाईक, विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, आरजे मनीष आपटे, सांगली येथील आरजे ओंकार, संजय घोडावत विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख जयप्रकाश पाटील, ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीहरी देशपांडे, तेजस्विनी देसाई, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर आदींनी नीना मेस्त्री-नाईक यांच्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या.